# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.02.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

• केंद्रीय अर्थसंकल्पाचा भर कृषी, ग्रामीण संपन्नता आणि नागरी विकास यांच्यावर असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं स्पष्टीकरण. सुधारणांची प्रक्रिया सुरूच राहणार असल्याची ग्वाही.

• पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून केंद्रीय अर्थसंकल्पाचं स्वागत. हा अर्थसंकल्प देशाच्या विकासाच्या दृष्टीनं क्रांतिकारी असल्याचं मत.

• दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठीसाठी प्रचार शिगेला. प्रचाराची उद्या सांगता.

• वक्फ सुधारणा विधेयकाबाबत संयुक्त संसदीय समितीचा अहवाल उद्या म्हणजे सोमवारी लोकसभेत सादर होणार.

• आणि

• महिला क्रिकेटमध्ये 19 वर्षांखालील मर्यादित 20 षटकांच्या विश्वकरंडक स्पर्धेत भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यात आज करंडकासाठी लढत, तर पुरुषांच्या क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंड यांच्यातील वीस षटकांच्या मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना आज मुंबईत.

**निर्मला सीतारामन प्रतिक्रिया**

केंद्रीय अर्थसंकल्पाचा भर कृषी, ग्रामीण संपन्नता आणि नागरी विकास यांच्यावर असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल स्पष्ट केलं. सुधारणांवरचा सरकारचा भर कायम राहील असंही त्यांनी माध्यमांशी बोलताना नमूद केलं. देशाची वाटचाल विकसित भारताकडे होण्यासाठी 2025-26 साठीच्या अर्थसंकल्पात अनेक गोष्टी असल्याचं त्यांनी सांगितलं. सरकारनं सहा विशिष्ट क्षेत्रं निवडली आहेत आणि त्यांच्यात सुधारणा सुरूच राहतील असं सीतारामन म्हणाल्या. अर्थसंकल्पात आरोग्य आणि शिक्षणाला प्राधान्य देण्यात आलं आहे. नागरिकांच्या मागणीवरून गेल्या वर्षी जुलैमध्ये प्राप्तिकरात सुलभतेबाबत काम सुरू झालं होतं आणि ते बऱ्याच प्रमाणात पूर्ण झालं आहे. या संदर्भात पुढच्या आठवड्यात नवीन प्राप्तिकर विधेयक सादर केलं जाईल, असं त्या म्हणाल्या. प्राप्तिकर सवलतीची मर्यादा सात लाख रुपयांवरून बारा लाख रुपयांवर नेल्यामुळे एक कोटी नागरिकांना फायदा होईल असं त्यांनी स्पष्ट केलं.

**सीतारामन अर्थसंकल्प**

सीतारामन यांनी काल 2025-26 या वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर केला. प्राप्तिकरातून सवलतीची मर्यादा बारा लाख रुपयांपर्यंत वाढवण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. प्रमाण वजावटीची रक्कमही पगारदार वर्गासाठी 75 हजार रुपये

करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिकांना व्याजाच्या उत्पन्नावर मिळणारी प्राप्तिकराची सवलत पन्नास हजार रुपयांवरून एक लाख रुपये इतकी करण्यात आली आहे. कृषी उत्पादकता आणि पीक वर्गवारी वाढवण्यासाठी शंभर जिल्ह्यांमध्ये पंतप्रधान धनधान्य कृषी योजना राबवली जाणार आहे. किसान क्रेडिट कार्डअंतर्गत मिळणाऱ्या व्याजमुक्त कर्जाची मर्यादा तीन लाख रुपयांवरून पाच लाख रुपयांवर नेण्यात आली आहे. अनुसूचित जाती आणि जमातीतल्या पहिल्यांदा उद्योजक बनणाऱ्या महिलांसाठी विशेष योजना राबवली जाणार आहे. ऑनलाइन संकेतस्थळ कंपन्यांच्या प्रत्यक्ष रस्त्यांवर काम करणाऱ्या कामगारांना पीएम जनआरोग्य योजनेअंतर्गत आरोग्य लाभ मिळणार आहेत. शिक्षण क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता गुणवत्ता केंद्रासाठी पाचशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मेक इन इंडियाला बळ देण्यासाठी राष्ट्रीय उत्पादकता अभियान राबवण्यात येणार आहे. सीमाशुल्कातून माफी मिळणाऱ्या औषधांच्या यादीत आणखी ३६ जीवनावश्यक औषधांचा समावेश करण्यात आला आहे. पुढच्या वर्षी वित्तीय तूट चार पूर्णांक चार दशांश टक्के इतकी राहील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विमा क्षेत्रातील थेट पकीय गुंतवणुकीची मर्यादा 74  टक्क्यांवरून 100  टक्क्यांवर नेण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अर्थसंकल्पाचं स्वागत केलं आहे. देशाच्या विकासाच्या दृष्टीनं हा अर्थसंकल्प क्रांतिकारी असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं आहे.

अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना ते म्हणाले...

**साथियो आम तोर पर बजेट का फोकस इस बात पर रेहता है की सरकार का खजाना कैसे भरेगा लेकीन ये बजेट देश के नागरीकोंकी जेब कैसे भरेगी , बचत कैसे बढेगी ये बजेट इसकी एक बहोत मजबूत निव रखता है**

**दिल्ली मतदान**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी उद्या प्रचाराची सांगता होत असल्यामुळे प्रचार शिगेला पोचला आहे. येत्या बुधवारी म्हणजे पाच तारखेला मतदान होणार आहे आणि आठ तारखेला मतमोजणी होणार आहे. सर्व पक्षांचे प्रमुख नेते रॅली आणि प्रचारसभांवर भर देत आहेत. भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दुपारी आरके पुरममध्ये सभा घेणार आहेत. भाजपाचे वरिष्ठ नेते आणि संरक्षणमंत्री राजनाथसिंह राजेंद्रनगर, चांदणी चौक आणि लक्ष्मीनगरमध्ये सभा घेणार आहेत. भाजपाचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल दिल्लीत अनेक ठिकाणी सभा घेतल्या. आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीच्या नागरिकांची दिशाभूत केल्याचा आरोप त्यांनी केला. कॉंग्रेसचे नेते अजय माकन आज दुपारी पत्रकार परिषद घेणार आहेत. कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी काल कॉंग्रेस राज्यघटनेच्या रक्षणासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. प्रियांका गांधी यांनी चांदणी चौक इथं सभा घेतली. आपचे नेते अरविंद केजरीवाल यांनी अनेक ठिकाणी सभा घेतल्या. आप सरकारनं दिल्लीतल्या शाळा, रुग्णालयं आणि सार्वजनिक सेवांमध्ये सुधारणा केल्याचं ते म्हणाले. दरम्यान, 85 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग यांच्या घरी जाऊन मतदान करून घेण्याच्या सुविधेला दिल्लीत मोठा प्रतिसाद मिळत आहे. या सुविधेसाठी नोंदणी केलेल्या मतदारांपैकी 92 टक्के मतदारांनी 31 जानेवारीपर्यंत मतदान केलं आहे.ही निवडणूक सुरक्षित आणि मुक्त वातावरणात पार पडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगानं दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**वक्फ अहवाल**

वक्फ सुधारणा विधेयकाबाबत संयुक्त संसदीय समितीनं दिलेला अहवाल उद्या म्हणजे सोमवारी लोकसभेत मांडला जाणार आहे. समितीचे अध्यक्ष जगंदबिका पाल आणि सदस्य संजय जयस्वाल हा अहवाल सादर करणार आहेत. समितीनं अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे हा अहवाल गुरुवारीच सुपूर्द केला आहे.

**छत्तीसगड**

छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत काल आठ माओवादी मारले गेले. जिल्हा राखीव दल, केंद्रीय राखीव पोलिस दल, कमांडो बटालियन आणि विशेष कृती दल यांच्या संयुक्त पथकानं ही कारवाई केल्याचं छत्तीसगड पोलिसांनी सांगितलं. गुप्तचरांकडून मिळालेल्या माहितीनंतर ही कारवाई करण्यात आली. सुरक्षा दलं आणि माओवाद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गोळीबार झाला. घटनास्थळावरून अनेक शस्त्रास्त्रं ताब्यात घेण्यात आली आहेत. शेवटचं वृत्त हाती येईपर्यंत आजूबाजूच्या भागात मोठ्या प्रमाणावर शोध मोहीम सुरू होती.

**सोमालिया हल्ले**

सोमालियात इस्लामिक स्टेटच्या अतिरेक्यांच्या तळांवर अमेरिकेच्या लष्करानं काल रात्री हवाई हल्ले केले. आयसिसचे म्होरके त्यात मारले गेल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे. ट्रंप यांनी अध्यक्षपदाची सूत्रं हातात घेतल्यानंतरची अमेरिकेची ही पहिलीच कार्यवाही आहे. यात कोणताही सर्वसामान्य नागरिक मृत्युमुखी पडला नसल्याचा दावा अमेरिकेच्या संरक्षण विभागानं केला आहे. उत्तर सोमालियातल्या गोलीस डोंगररांगांमध्ये हे हल्ले झाल्याचं अमेरिकेचे संरक्षणंत्री पीट हेगसेथ यांनी म्हटलं आहे.

**सुदानबॉम्ब**

सुदानची राजधानी खार्टूममध्ये ओमदुरमन शहरातल्या बाजारपेठेत काल निमलष्करी शीघ्र कृती दलानं केलेल्या बॉम्बहल्ल्यात 54 नागरीक ठार झाले तर दीडशेहून अधिक जखमी झाल्याचं वृत्त आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, शीघ्र कृती दलाच्या नियंत्रणाखाली असलेल्या परिसरातून हा हल्ला झाला, तसंच त्यात ड्रोनचाही वापर करण्यात आला. सुदाममध्ये सुरू असलेल्या यादवीतून हा हल्ला झाला आहे.

**कुंभमेळा**

प्रयागराज इथं सुरू असलेल्या कुंभमेळ्यात 77 देशांमधले राजदूत आणि विभागप्रमुखांचा समावेश असलेल्या 118 जणांच्या शिष्टमंडळानं काल पवित्र स्नान केलं. भारतीय संस्कृती आणि अध्यात्माबाबत विविध देशांच्या राजदूतांनी आणि कुटुंबीयांना आदर व्यक्त केला आणि या मोठ्या सोहळ्यासाठीच्या व्यवस्थेचं कौतुक केलं.

**19 वर्षा खालील महिला**

महिला क्रिकेटमध्ये 19 वर्षांखालील मर्यादित 20 षटकांच्या विश्वकरंडक स्पर्धेतल्या अंतिम सामन्यात, भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यात करंडकासाठी लढत होणार आहे. आज दुपारी बारा वाजता सामन्याला सुरुवात होणार आहे. शुक्रवारी महिला संघानं इंग्लंडच्या संघाचा पराभव केला होता.

**भारत इंग्लंड**

दरम्यान, भारत आणि इंग्लंड यांच्यातील मर्यादित वीस षटकांच्या मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना आज मुंबईत वानखेडे मैदानावर होणार आहे. आज संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होणार आहे. भारताने या मालिकेत 3-1 अशी विजयी आघाडी घेतली आहे. या मालिकेनंतर सहा फेब्रुवारीपासून पन्नास षटकांच्या एकदिवसीय मालिकेला सुरुवात होणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**